एप्रिल २००४

# पैसे देऊ नका

२००३-२००४ हे सहकार वर्ष ३१ मार्च २००४ रोजी संपले. अद्यावत रेकॉर्ड बनविणे, थकबाकी कमी करणे ह्यात सर्वांनी प्रचंड वेळ  खर्च केलेला आहे. आणि बऱ्याच पतसंस्थांना यश सुध्दा आलेले आहे. परंतु आता शासकिय लेखापरिक्षणाचा तथाकथित फार्स चालू होणार आहे. त्यात भर पडली आहे. लेखापरिक्षणाच्या वर्गवारी निकषांची, एकेक अकलेचे तारे व मार्कस् कशी कमी करायची व वाढवायची यांचे अजब तंत्र लेखापरिक्षणाच्या वेळी अवलंबिले जाणार आहे. म्हणून आपल्या सर्वांना कळविण्यात येते की, त्या ''लेखापरिक्षकांना व दलालांना'' अजिबात पैसे देऊ नका. आपले रेकॉर्ड स्वत:च अद्यावत ठेवा. एखाद्या कामाची पुर्तता झाली नाही, तर अनियमितता होईल. परंतु सर्वांनी गांगरून जायचे कारण नाही. आणि पैसे घेऊन जर वर्गवारी मिळत असेल, तर अशी वर्गवारी मुळीच नको. आणि राज्यात आता आपणालाच ह्या वर्गवारी संबंधात वातावरण तयार करावे लागणार आहे. ''ब'' वर्ग ''क'' वर्ग जर पैसे न दिल्यामुळे मिळणार असेल तर आपणही त्यातून शिकले पाहिजे, आणि मुळ शोधून काढून पुढच्या वर्षी सुधारणा केली पाहिजे. आपण वर्गवारीचा बाऊ केला म्हणून हे अधिकारी लचके तोडतात. अजिबात ह्या बाबीला भिक घालू नका. आपोआप भविष्यात पैसे घेऊन - देऊन लेखापरिक्षणात वर्गवारी थांबेल. ह्या मोहाला बळी पडू नका.

काही पतसंस्था वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यासाठी ३ किंवा ६ महिन्यापर्यंत मुदत वाढ घेण्यासाठी धडपडतात. काही संस्था तर मुदत वाढ न घेताही १४ ऑगस्टपुर्वी सभा घेत नाही. त्याची किंमत पैशानेच मोजावी लागते. हे कशासाठी ? अजिबात मुदतवाढ घेऊ नका. १४ ऑगस्टपुर्वीच वार्षिक सर्वसाधारण सभा सर्व पतसंस्थांनी घ्यावी. आपोआप दलाल उपाशी राहतील. व ज्यांना सरकारचा पगार मिळतो, त्यांची पगाराशिवाय पैशांची लागलेली चटक आता आपणच हाणून पाडली पाहिजे.

पुणे येथील आयुक्तांचे कार्यालय म्हणजे राज्याच्या सहकार चळवळीवर नियंत्रण ठेवणारी अधिकृत व महाराष्ट्र सरकारने नेमलेली एजन्सी आहे. म्हणून कार्यकर्त्यांनी स्वत:च्या संस्थेच्या कुठल्याही कामासाठी स्वत: तेथे जावे. केवळ ह्या सुधारित पध्दतीमुळे दलाल हतबल होतील. व ज्यांनी हे दलाल पोसले तेही उघडे पडतील. परंतु कुठल्याही कामासाठी येथून पुढे तरी अजिबात पैसे देऊ नका. पैसे दिल्याशिवाय काम होतच नाही व होणारही नाही, ही भावना म्हणजे स्वत:चेच मानसिक दुर्बलतेचे प्रदर्शन होय. आम्हांला कळवा व पैशाशिवाय कसे काम होते हे आम्ही प्रत्यक्ष कृतीने दाखवू. परंतु बेकायदेशीर काम करण्याची मनोवृत्ती थांबविलीच पाहिजे.

संस्थेची आर्थिक क्षमता नसताना व धोरणात नसताना पतसंस्थेचे कार्यक्षेत्र वाढवून घेणे व पतसंस्थेची शाखा आपल्या जन्म गावी व जिल्ह्यात नेणे ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. पैसे देवून शाखा उघडण्यास परवानगी देणारे महाभाग एक दिवस ह्या राज्यात अडचणीत येतील. कोणीही मध्ये येणार नाही. व दलाल ही संकल्पना किती धोक्याची आहे, हे सर्वांना समजेलच. ठराविक व्यक्ति जेव्हा त्या इमारतीत दिसतात ते दलालीशिवाय काय करतात हे पुरावे बाहेर येतीलच. परंतु याच अधिकाऱ्यांनी पैसे मिळविण्यासाठी वॉर्डात, तालुक्यात, जिल्ह्यात,

विभागात व राज्यात हैदोस चालू केला आहे, त्याला आपण निर्भिडपणे पैसे न देतामुकाबला करायचा आहे. ह्या तुमच्या – माझ्या महाराष्ट्रात सहकार आम्हांला कोणी शिकवू नये, व त्यासाठी अधिकाराचा गैरवापर करून पतसंस्थांना घाबरविण्याचे षडयंत्र आपण भविष्यात मोडून काढीत आहोत.

एकच विनंती की, कुठल्याही कामासाठी कोणालाही एक नवा पैसा देऊ नका. काम होण्यास थोडा वेळ लागेल, पण काम करून घेण्याची जबाबदारी आम्ही स्विकारतो. न घाबरता आम्हांला कळवा.

राज्यातील **१४ हजारांच्यावर पतसंस्थांनी ''पैसे देणार नाही''** हे धोरण स्विकारले व अंगिकारले तर किती व कोणाचे पैसे वाचतील, ही आकडेवारी ज्याने त्याने शोधायची आहे.

७८, ८३, ८८ किंवा भारतीय दंड विधानाचा आधार घेऊन पोलिस केस करण्याची धमकी देणारे, ह्यांच्या विरूध्द कायद्याने बंड पुकारण्याची हिंमत महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांकडे आहे. हे एकदा दाखवाच!

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**